गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १९८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282



मुस्लिम बांधवांचा ईद हा मोठा सण असून बाजारपेठेत मीना बाजार भरवण्यात आला असून ईद साठी लागणारे साहित्य खरेदी करताना महिला भगिनी दिसत आहे (छायाचित्र किरण खानापुरे)

## भक्तीच्या शक्तीतून समाजात एकात्मता - भास्कर दानवे

### दत्त नगर येथे अखंड हरीनाम सप्ताह सोहळा उत्साहात संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** दत्तनगर, जालना येथे अखंड हरिनाम सप्ताहाच्या समाप्ती निमित्त आयोजित शिवपुराण महाकथा व तुलसी अर्जुन सोहळा कथावाचक ह.भ.प. श्री गिरी महाराज यांच्या मधुर वाणीतून संपन्न झाला. यावेळी ह.भ.प. श्री शिवाजी महाराज पवार यांचे काल्याचे कीर्तन पार पडले. या सोहळ्यास भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक भास्कर आबा दानवे यांनी उपस्थित राहून सर्व भाविक भक्तांशी संवाद साधला व संतांचे आशीर्वाद घेतले.

यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, अशा धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात एकात्मता आणि सद्भावना वाढीस लागते, संत परंपरेतून समाजाला सदाचार, संस्कार आणि मानवतेचा संदेश मिळत असतो. अशा धार्मिक उपक्रमांमुळे नव्या पिढीमध्ये चांगले विचार रुजतात आणि समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. दत्तनगर परिसरात इतक्या मोठ्या प्रमाणावर भक्तीमय कार्यक्रमाचे आयोजन करणे ही अभिमानाची बाब आहे. भविष्यातही अशा उपक्रमांमुळे समाजातील बंधुभाव अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी जालना शहर महानगरपालिका स्थायी समिती सभापती अशोक अण्णा पांगरकर, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीभाऊ पठाडे, नगरसेवक सिद्धिविनायक मुळे, नगरसेविका श्रीमती सुशीलाताई दानवे, रवी राऊत, विष्णू बापू डोंगरे, गोवर्धन कोल्हे, देविदास देशमुख, राजेश जोशी, बबन शिरसाठ, निवृत्ती लंके आदींची उपस्थिती होती.

## खूनाच्या आरोपातून तरुणाची निर्दोष मुक्तता

**जालना । प्रतिनिधी -** किल्ला जिनिंग परिसरात झालेल्या बहुचर्चित खून प्रकरणातून जिल्हा व सत्र न्यायालयाने संशयित तरुण विजय मुंगसे याची निर्दोष मुक्तता केली आहे.

शहरातील किल्ला जिनिंग परिसरात दि. २५ एप्रिल २०१९ रोजी कुमार झुंजूर याची हत्या झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून संशयित विजय मुंगसे (रा. मस्तगड) यास ताब्यात घेत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. तीन वेगवेगळ्या न्यायाधीशांसमोर खटल्याची सुनावणी झाली. सरकारी पक्षातर्फे १३ साक्षीदार सादर करण्यात आले.बचाव पक्षातर्फे ॲड रोहित बनवसकर यांनी साक्षीदारांची उलट तपासणी घेत पुरावे आणि तपासातील विसंगती न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि पुराव्यांचे अवलोकन करत प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा मोहिते यांनी संशयित विजय मूंगसे याची निर्दोष मुक्तता केली.बचाव पक्षातर्फे ॲड. रोहित बनवसकर यांनी बाजू मांडली त्यांना ॲड. दिपाली भालशंकर यांनी सहकार्य केले.



युवा आदर्श

### पाडवा ...

पायंडा नवा पाडावा
वैरभाव रे विसरावा
अंतर्बाह्य सुचिर्भूत
नात्यात का दुरावा
जाणून घ्या पाडवा
सस्नेह योग घडावा
डोळस श्रद्धेचा ठेवा
भावभक्तीचा चढावा
राम राज्य शुभारंभ
अध्याय आरंभ नवा
एकला चलो रे नको
संघ भावा अनुभवा
गुढी सह साडी एक
गरीब नारीस नेसवा
सणांचे हेचि महत्व
एका दुखीता हसवा
नियम कायदे पाळा
तब्येत तंदुरुस्त ठेवा
व्हायरस येता नवा
घोर ना लागो जीवा
दुज्यासहीत पंगतीत
रे मीठ भाकर जेवा
गोडी भरेल रक्तात
श्रीखंडा वाटेल हेवा
प्रदूषण खूप झाले
बदलावी आतां हवा
बदलत्या युगा सवे
बदल अंतरी व्हावा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## चंदनझीरा परिसरात कोट्यवधींचा रस्ता का फोडावा लागतोय?

### मनपाच्या आडमुठ्या धोरणाचा नागरीकांना फटका; दोन महिन्यांपासून नळपुरवठा ठप्प, कुंभकर्णी झोपेत पाणीपुरवठा विभाग

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील चंदनझीरा परिसरात महानगरपालिकेच्या भोंगळ आणि नियोजनशून्य कारभारामुळे नागरिक संतप्त झाले असून ‘‘अधिकाऱ्यांचे डोके ठिकाणावर आहे का?’’ असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. जालना शहरातील चंदनझीरा परिसरात मौलाना आझाद चौक ते एकता चौक दरम्यान कोट्यवधी रुपये खर्चून नुकताच तयार करण्यात आलेला कॉंक्रीट रस्ता आता पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईनसाठी पुन्हा खोदण्यात येत आहे.

पाणीपुरवठ्याची पाईपलाईन सुरळीत करण्याचे काम रस्ता बांधण्यापूर्वी करणे अपेक्षित असताना, कंत्राटदार आणि मनपा अधिकाऱ्यांच्या अडेलतट्टू पणामुळे आधी रस्ता तयार करण्यात आला आणि आता तोच रस्ता फोडण्याची वेळ आली आहे. यामुळे कोट्यवधी रुपयांचा अपव्यय झाल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.



गेल्या दोन महिन्यांपासून या परिसरातील सात ते आठ गल्लीतील नागरिकांना नळाद्वारे पाणीपुरवठा मिळालेला नाही. ऐन उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना वनवन भटकण्याची वेळ आली आहे. मनपा प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप नागरीकांमधून होत आहे.

पाईपलाईन टाकताना नाल्याचे व सांडपाण्याचे पाणी थेट पिण्याच्या पाण्यात मिसळत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. परिसरात दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या घरात नळातून नाल्यांमधून वाहनारे शौचालयाचे दूषित आणि घाण पाणी येत आहे. यामुळे आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

रस्ता कामासाठी दोन्ही बाजूंच्या नागरिकांची घरे तोडण्यात आली. त्यानंतर काम अनेक दिवस रखडून ठेवले आणि नागरीकांचे घरे तोडून त्यांना धारेवर धरण्याचे काम केले. अंडरग्राऊंड नाल्या व पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईन्स पूर्ण न करताच पान २ वर

### जालना हादरलं!

## विधीसंघर्षग्रस्त बालकाचा तरुणावर थरारक चाकू हल्ला

**जालना । प्रतिनिधी -** शहर पुन्हा एकदा गुन्हेगारीच्या छायेत आले असून कडबी मंडी परिसरात घडलेल्या चाकू हल्ल्याच्या थरारक घटनेने नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं आहे. दिनांक १६ सोमवार रोजी रात्रीच्या सुमारास एका तरुणावर थेट बरगडीत चाकू खुपसत जीवघेणा हल्ला करण्यात आल्याने शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.




करण राजपूत असे जखमी तरुणाचे नाव असून, एका विधीसंघर्षग्रस्त बालकाने धारदार चाकूने त्याच्यावर अचानक पान २ वर

### महामार्गांवरील अतिक्रमणे तात्काळ हटवा, राजस्थान उच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण निर्देश

# जालन्यातही अंमलबजावणीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रीय महामार्गांच्या हद्दीतील अतिक्रमणे ही सार्वजनिक सुरक्षेसाठी गंभीर धोका असून ती तात्काळ हटवली पाहिजेत, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण राजस्थान उच्च न्यायालयाच्या जोधपूर खंडपीठाने एका जनहित याचिकेत नोंदवले आहे. या निकालाचे स्वागत करत, नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी जालन्यातील महामार्गांवरील अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी नवनियुक्त जालना महानगरपालिकेकडे केली आहे.

राजस्थान उच्च न्यायालयासमोर हिम्मत सिंग गेहलोत विरुद्ध राजस्थान सरकार (डी.बी. सिव्हिल रिट याचिका क्र. २४८२६/२०२५) या प्रकरणात सुनावणी झाली. एका धर्मकाट्याच्या (वजन काटा) अतिक्रमणामुळे झालेल्या भीषण अपघातात चार जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेची न्यायालयाने गंभीर दखल घेतली. सुनावणीदरम्यान, न्यायालयाने स्पष्ट केले की ही केवळ एकट्या अतिक्रमणाची समस्या नसून राज्यभरातील राष्ट्रीय महामार्गांवर राइट ऑफ वे म्हणजेच रस्त्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत, ज्यामुळे मानवी जीवनाला सतत धोका निर्माण होत आहे.

न्यायालयाने राष्ट्रीय महामार्ग कायदा, १९५६ आणि भारतीय रस्ते काँग्रेसच्या मानकांनुसार महामार्गांच्या तांत्रिक सीमांची नोंद घेतली. यानुसार, महामार्गाच्या मध्यरेषेपासून दोन्ही बाजूंना सुमारे ४० मीटरपर्यंत रस्त्याच्या जमिनीची हद्द किंवा इमारत रेषा असते आणि सुमारे ७५ मीटरपर्यंत नियंत्रण रेषा असते. या हद्दी वाहनांना स्पष्ट दिसण्यासाठी, आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षिततेसाठी आणि भविष्यातील रस्ता विस्तारीकरणासाठी अत्यंत आवश्यक आहेत. या क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे बांधकाम किंवा अतिक्रमण करणे हे थेट सुरक्षिततेच्या नियमांचे उल्लंघन आहे, असे न्यायालयाने अधोरेखित केले.

या निकालावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले, ‘‘राजस्थान उच्च न्यायालयाचा हा निर्णय देशभरातील महामार्ग सुरक्षेसाठी एक मैलाचा दगड आहे. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की महामार्गांवरील अतिक्रमणे केवळ वाहतुकीला अडथळा नसून, ती नागरिकांच्या जीवाशी खेळ आहेत. आज जालना शहरातून जाणाऱ्या सर्वच राष्ट्रीय महामार्गांवर हॉटेल, दुकाने आणि इतर बांधकामांच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली आहेत. यामुळे अपघातांचा धोका प्रचंड वाढला आहे आणि वाहतुकीची मोठी कोंडी होत आहे.‘‘

ॲड. धन्नावत पुढे म्हणाले, ‘‘नवनियुक्त जालना महानगरपालिकेने या निकालाची गांभीर्याने दखल घेऊन शहरातील महामार्गांवरील सर्व अतिक्रमणे तात्काळ हटवण्यासाठी विशेष मोहीम राबवावी. सध्या जालना जिल्हाधिकाऱ्यांकडेच महानगरपालिका आयुक्तांचा पदभार आहे. त्यांनी या विषयात अधिक तत्परता दाखवून, कोणत्याही दबावाला बळी न पडता, नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. महामार्गाची हद्द मोकळी ठेवणे हे कायद्याने बंधनकारक असून त्याची कठोर अंमलबजावणी करणे प्रशासनाचे कर्तव्य आहे.‘‘

एकंदरीत, राजस्थान उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे देशभरातील स्थानिक प्रशासनांना महामार्गांवरील अतिक्रमणे हटवण्यासाठी एक कायदेशीर आणि नैतिक बळ मिळाले आहे. जालन्यातील प्रशासन यावर किती वेगाने आणि प्रभावीपणे कारवाई करते, याकडे आता सर्व जालनावासीयांचे लक्ष लागले आहे.

# संपादकीय पान

## आरोग्य सांभाळा....!

राज्यात सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच राज्यातील तापमान वाढायला सुरुवात झाली होती. सर्वत्र उकाडा जाणवत होता. आता मार्च महिन्याच्या अखेरीस तर राज्यातील अनेक शहरांचे तापमान उच्चांकी पातळीवर पोहचले आहे. राज्यातील काही शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात पोहचले आहे. काही शहरांनी तर ४० अंशाचा आकडा देखील पार केला आहे. विदर्भ मराठवाड्यात तर तापमानाने आजच उच्चांक गाठला आहे. पुढील दोन आठवड्यात राज्यातील सर्वच शहरांचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या घरात पोहचेल आणि राज्यात प्रचंड उकाडा जाणवेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. पुढील दोन महिने राज्यातील तापमान उच्चांकी अंशावर पोहचेल आणि राज्यात यावर्षी प्रचंड उकाडा जाणवेल हा हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज खरा ठरताना दिसत आहे. याशिवाय यावर्षी राज्यात उष्णतेच्या लाटा येतील असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हा अंदाज नागरिकांची झोप उडवणारा ठरत आहे कारण मार्च महिन्यातच सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली असल्याने पुढील दोन महिने कसे निघेल याच चिंतेत नागरिक आहेत. पुढील दोन महिन्यात राज्यात उष्णतेच्या लाटा येणार असून तापमान प्रचंड वाढणार असल्याने हे दोन महिने जनतेसाठी जीकरीचे ठरणार असल्याने उन्हापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागणार आहे. उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाळ्याच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिणाम माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्याचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात. उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. रक्तदाब आणि मधुमेहासारख्या व्याधी असलेल्या व्यक्तींनी उन्हाळ्यात विशेष खबरदारी घ्यावी. उन्हाळ्यात उष्माघात होण्याचे प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळीच उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता असते. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे. दुपारी बारा ते चार घराबाहेर पडूच नये, काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना टोपी, गॉगल, बूट, चपलांचा वापर करावा. हलकी, पातळ, सच्छिद्र कपडे वापरावेत. उन्हात काम करणाऱ्या व्यक्तींनी टोपी, छत्री, गॉगल यांचा नियमित वापर करावा. तापमान वाढले की शरीरातील पाणी कमी होते त्यामुळे डीहायड्रेशन होते. डीहायड्रेशन झाले की शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते आणि चक्कर येते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये यासाठी सतत पाणी पीत राहावे. शरीरात दररोज किमान दोन लिटर पाणी जाणे गरजेचे असते. घराबाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत न्यायला विसरू नका. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, भाज्यांचे, फळांचे रस दररोज प्यायले तरी हरकत नाही. मार्च महिन्यातच उन्हाळ्याच्या झळा जाणवू लागल्याने पुढील दोन महिने उष्णतेची तीव्रता किती असेल याची कल्पना केली तरी या वर्षीची उन्हाची दाहकता लक्षात येईल. त्यामुळेच प्रत्येकाने उन्हाळ्यात आपले आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. खबरदारी घेऊनच आपण उन्हाच्या तीव्रतेपासून स्वतःचा बचाव करू शकतो.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

पान १ वरुन

### चंदनझिरा परिसरात ...

काँक्रीट रस्ता तयार करण्यात आला. परिणामी आता तोच रस्ता पुन्हा फोडण्याची वेळ आली आहे.

महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभांमध्ये स्वच्छता आणि पाणीपुरवठा विषयावर अनेक नगरसेवकांनी प्रशासनावर संताप व्यक्त केला. मात्र, पाणीपुरवठा विभाग अद्यापही कुंभकर्णी झोपेत असल्याचे चित्र आहे. मागील अनेक वर्षापासून नगरपालिका आणि त्यानंतर झालेल्या महानगरपालिका मध्ये प्रशासक राज असल्यामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांना लोकप्रतिनिधींचा वचक राहिलेला नव्हता. त्यामुळे अनेक अधिकारी आणि कर्मचारी अडेलतट्टू आणि मनमानी कारभार करत होते. परंतु आता महानगरपालिकेमध्ये महापौर,उपमहापौर आहे तसेच विविध विभागाचे सभापती, स्थाई समिती सदस्य यांची नेमणूक झालेली आहे. या लोकप्रतिनिधींनी आता अधिकाऱ्यांवर वचक निर्माण करावा आणि नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी नागरिकांच्या वतीने मागणी होत आहे. त्याच प्रमाणे आमदार, खासदार आणि स्थानिक नगरसेवकांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून नागरिकांना नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे. मनपा प्रशासनाचा हा आडमुठेपणा आणि ढिसाळ कारभार असाच सुरू राहिल्यास लोकप्रतिनिधीं विरोधात नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण होऊन मोठे आंदोलन उभे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### विधी संघर्षग्रस्त ...

हल्ला चढवला. हा हल्ला इतका भीषण होता की, करणच्या बरगडीत चाकू घुसलेल्या अवस्थेतच तो जीव वाचवण्यासाठी धावत रुग्णालयात पोहोचला. रात्रीच्या सुमारास घडलेल्या या घटनेने परिसरात अक्षरशः खळबळ उडाली. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत करणला रुग्णालयात दाखल केले. प्रथम जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार करून त्याला पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. तेथे तातडीची शस्त्रक्रिया करून त्याच्या बरगडीत अडकलेला चाकू बाहेर काढण्यात आला. सध्या करणची प्रकृती स्थिर असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, हल्लेखोर विधीसंघर्षग्रस्त बालकाला सदर बाजार पोलिसांनी ताब्यात घेतले असून या घटनेचा तपास सुरू आहे. मात्र, अल्पवयीनांकडून अशा प्रकारचे धक्कादायक गुन्हे घडत असल्याने शहरातील सुरक्षेवर मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं असून पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. शहरात वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी ठोस पावले उचलली जाणार का, असा सवाल आता सर्वसामान्य नागरिक करत आहेत.

# गुढीपाडव्याच्या दिवशी करावयाच्या धार्मिक कृती - सनातन संस्था

कुठलाही सण आला की त्या त्या सणाच्या वैशिष्ट्याप्रमाणे आणि आपल्या पद्धतीप्रमाणे आपण काहीतरी करीतच असतो. मात्र धर्मात सांगितलेल्या अशा पारंपरिक कृतींमागील अध्यात्मशास्त्र लक्षात घेतल्यास त्याचे महत्त्व आपल्याला पटते. गुढीपाडव्याच्या दिवशी केल्या जाणाऱ्या धार्मिक कृतींची माहिती सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखात जाणून घेऊया तसेच सध्याच्या आपत्काळात गुढीपाडवा कसा साजरा करायचा हेही समजून घेऊया.

अभ्यंगस्नान (मांगलिक स्नान) : गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळी लवकर उठून प्रथम अभ्यंगस्नान करण्यास सांगितले आहे. अभ्यंगस्नान करतांना देशकालकथन करतात.

तोरण लावणे : स्नानानंतर आम्रपल्लवांची तोरणे सिद्ध करून प्रत्येक द्वाराशी लाल फुलांसहित बांधावी; कारण लाल रंग शुभदर्शक आहे.

पूजा : प्रथम नित्यकर्म देवपूजा करतात. 'वर्षप्रतिपदेला महाशांती करायची असते. शांतीच्या प्रारंभी ब्रह्मदेवाची पूजा करतात; कारण या दिवशी ब्रह्मदेवाने विश्वाची निर्मिती केली. पूजेत त्याला दवणा वाहतात. नंतर होमहवन आणि ब्राह्मणसंतर्पण करतात. मग अनंत रूपांनी अवतीर्ण होणाऱ्या विष्णूची पूजा करतात. 'नमस्ते बहुरूपाय विष्णवे नमः ।', हा मंत्र म्हणून त्याला नमस्कार करतात. नंतर ब्राह्मणाला दक्षिणा देतात. शक्य झाले तर इतिहास, पुराणे इत्यादी ग्रंथ ब्राह्मणाला दान देतात. ही शांती केल्याने सर्व पापांचा नाश होतो, उत्पात घडत नाहीत, आयुष्य वाढते आणि धनधान्याची समद्धी होते, असे सांगितले आहे.' संवत्सर पूजा केल्याने सर्व पापांचा नाश होतो, आयुष्यवृद्धी होते, सौभाग्याची वाढ होते आणि शांती लाभते. या दिवशी जो वार असेल, त्या वाराच्या देवतेचीही पूजा करतात.

गुढी उभारणे : या दिवशी विजयाचे प्रतीक म्हणून सूर्योदयाच्या वेळी शास्त्रशुद्ध गुढी उभारली जाते. गुढी सूर्योदयानंतर लगेचच मुख्य द्वाराच्या बाहेर; परंतु उंबरठ्यालगत (घरातून पाहिल्यास) उजव्या अंगाला (बाजूला) भूमीवर पाट ठेवून त्यावर उभी करावी. गुढी उभी करतांना तिची स्वस्तिकावर स्थापना करून पुढे थोडीशी कललेल्या स्थितीत उंचावर उभी करावी. सूर्यास्ताच्या वेळी गुळाचा नैवेद्य दाखवून गुढी उतरवावी.

दान : याचकांना अनेक प्रकारची दाने द्यावीत, उदा. पाणपोईद्वारा उदकदान. याने पितर संतुष्ट होतात. 'धर्मदान'



हे सर्वश्रेष्ठ दान आहे, असे शास्त्र सांगते. सध्याच्या काळात धर्मशिक्षण देणे, ही काळाची आवश्यकता आहे.

पंचांगश्रवण : ज्योतिषाचे पूजन करून त्याच्याकडून किंवा 'उपाध्याकडून नूतन वर्षाचे पंचांग अर्थात् वर्षफल श्रवण करतात. या पंचांगश्रवणाचे फल सांगितले आहे, ते असे

तिथेश्च श्रीकरं प्रोक्तं वारादायुष्यवर्धनम् । नक्षत्राद्धरते पापं योगाद्रोगनिवारणम् ।।
करणाच्चिन्तितं कार्यं पञ्चाङ्गफलमुत्तमम् । एतेषां श्रवणान्नित्यं गङ्गास्नानफलं लभेत् ।।

अर्थ : तिथीच्या श्रवणाने लक्ष्मी लाभते, वाराच्या श्रवणाने आयुष्य वाढते, नक्षत्रश्रवणाने पापनाश होतो, योगश्रवणाने रोग जातो, करण श्रवणाने चिंतिले कार्य साधते. असे हे पंचांगश्रवणाचे उत्तम फल आहे. त्याच्या नित्य श्रवणाने गंगास्नानाचे फल मिळते.'

कडुनिंबाचा प्रसाद : पंचाग श्रवणानंतर कडुनिंबाचा प्रसाद वाटायचा असतो. हा प्रसाद कडुनिंबाची पाने, जिरे, हिंग, भिजलेली चण्याची डाळ आणि मध यांपासून सिद्ध करतात.

भूमी (जमीन) नांगरणे : या दिवशी भूमीत नांगर धरावा. नांगरण्याच्या क्रियेने खालची माती वर येते. मातीच्या सूक्ष्म कणांवर प्रजापति लहरींचा संस्कार होऊन बीज अंकुरण्याची भूमीची क्षमता अनेक पटींनी वाढते. शेतीची अवजार अन् बैल यांवर प्रजापति लहरी उत्पन्न करणाऱ्या मंत्रासह अक्षता टाकाव्या. शेतात काम करणाऱ्या माणसांना नवीन कपडे द्यावे. या दिवशी शेतात काम करणारी माणसे अन् बैल यांच्या भोजनात पिकलेला भोपळा, मुगाची डाळ, तांदुळ, पुरण इत्यादी पदार्थ असावेत.

सुखदायक कृत्ये : नाना प्रकारची मंगल गीते, वाद्ये आणि पुण्य पुरुषांच्या कथा ऐकत हा दिवस आनंदाने घालवावा. हल्लीच्या काळी सण म्हणजे मौजमजा करण्याचा दिवस अशी काहीशी संकल्पना झाली आहे; मात्र हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे सण म्हणजे 'अधिकाधिक चैतन्य मिळवण्याचा दिवस' असतो. त्यामुळे सणाच्या दिवशी सात्त्विक भोजन, सात्त्विक पोषाख, तसेच अन्य धार्मिक कृत्ये इत्यादी करण्यासमवेतच सात्त्विक सुखदायी कृत्ये करण्यास शास्त्राने सांगितले आहे. सण, धार्मिक विधीच्या दिवशी अन् गुढीपाडव्यासारख्या शुभदिनी नवीन किंवा कौशेय (रेशमी) वस्त्रे आणि अलंकार धारण केल्याने देवतांचे आशीर्वाद लाभतात.वस्त्रांत आकृष्ट झालेल्या देवतांच्या तत्त्व लहरी वस्त्रांमध्ये दीर्घकाळ टिकून रहातात आणि ही वस्त्रे वर्षभर परिधान करणाऱ्याला देवतांच्या तत्त्वलहरींचा वर्षभर लाभ होतो.

गुढीपाडव्याच्या दिवशी करावयाची प्रार्थना : 'हे ईश्वरा, आज तुझ्याकडून येणारे शुभाशीर्वाद आणि ब्रह्मांडातून येणाऱ्या सात्त्विक लहरी मला जास्तीतजास्त ग्रहण करता येऊ देत. या लहरी ग्रहण करण्याची माझी कुवत नाही. मी तुला संपूर्ण शरण आलो आहे. तूच मला या सात्त्विक लहरी ग्रहण करायला शिकव', हीच तुझ्याचरणी प्रार्थना !

संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

## घाणेवाडी येथे आरोग्य व रोगनिदान शिबिर उत्साहात संपन्न



**घाणेवाडी । प्रतिनिधी -** येथील छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय आणि शंकरराव खंडाळे स्मरणार्थ प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले मोफत आरोग्य व रोगनिदान शिबिर आज, दिनांक १६ मार्च २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय व शंकरराव खंडाळे स्मरणार्थ प्रतिष्ठान, घाणेवाडी यांनी आयोजन केले. तर डॉ. भावेश मांदळे आणि सिद्धार्थ पट्टेकर. यांची प्रमुख उपस्थिती होती. मौजे घाणेवाडी येथील मोठ्या संख्येने महिला व पुरुषांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांची प्राथमिक तपासणी करून त्यांना योग्य ते सल्ले देण्यात आले. या प्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि कार्यकर्ते उपस्थित होते, ज्यात प्रामुख्याने: वामनराव कावळे सुखदेव खंडाळे, अंकुश कावळे, विलास कावळे, गौरव खंडाळे, गणेश लहाने या सर्वांच्या उपस्थितीत आणि सहकार्याने हे शिबिर यशस्वीरित्या पार पडले. सुरेश खंडाळे यांनी या उपक्रमाचे नियोजन व माहिती दिली.

## जालना जिल्ह्यासाठी हवामान सतर्कतेचा इशारा नागरिकांनी दक्षता बाळगावी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिनांक १८ मार्च २०२६ रोजी दुपारी १२:२६ वाजता दिलेल्या अंदाजानुसार, जालना जिल्ह्यात दिनांक १८ मार्च २०२६ रोजी यलो अलर्ट (सावधानतेचा इशारा) जारी करण्यात आलेला असून, काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वारे व सोसाट्याचा वारा (५० ते ६० किमी प्रतितास), तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे.

तसेच दिनांक १९ मार्च २०२६ रोजी ऑरेंज अलर्ट (सावधानतेचा इशारा) जारी करण्यात आलेला असून, काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वारे व सोसाट्याचा वारा (५० ते ६० किमी प्रतितास), तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर, जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी खालीलप्रमाणे आवश्यक दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

नागरिकांसाठी सूचना : विजांच्या कडकडाट व वादळी वाऱ्याच्या वेळी घराबाहेर अनावश्यक हालचाल टाळावी. विजेच्या तारा, झाडे व उंच बांधकामांपासून दूर राहावे. मेघगर्जना/वीजांच्या वेळी झाडाखाली उभे राहू नये व सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. मोकळ्या मैदानात, विद्युत खांब, ट्रान्सफॉर्मर व लोंबकळणाऱ्या तारांपासून दूर राहावे. वीज कडकडाटाच्या वेळी शक्यतो विद्युत उपकरणांचा वापर टाळावा.

वाहनचालकांनी सावधगिरी बाळगून सुरक्षित ठिकाणी वाहन उभे करावे.

शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवावीत.

वादळी पाऊस व विजांच्या कडकडाटाच्या वेळी जनावरांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे.

वादळी वाऱ्यामुळे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी.

नागरिकांनी हवामान विभागाच्या अद्ययावत अंदाजावर लक्ष ठेवून स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे.

## महाराष्ट्राच्या भूमीवर प्रथमच 'कर्वी ग्लॅमर'चा भव्य सोहळा

**मुंबई । प्रतिनिधी -** महाराष्ट्राच्या भूमीवर प्रथमच देशातील सर्वात मोठा आणि अनोखा मिस्टर, मिस आणि मिसेस इंडिया प्लस साईज ब्युटी पेजंट फॅशन शो २०२६ (सीझन २) चा भव्य सोहळा १७ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला. देशभरातून आलेल्या स्पर्धकांनी या मंचावर आत्मविश्वास आणि प्रतिभेचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.

हा कार्यक्रम कर्वी ग्लॅमर इव्हेंट अंतर्गत आयोजित करण्यात आला होता. याची प्रमुख आयोजक व मेघना चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापक समाजसुधारक मेघना शेंडगे यांनी हा सोहळा बॉलिवूड स्टाईलमध्ये सादर केला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश सौंदर्याला आत्मविश्वासासह साजरे करणे आणि प्रत्येक व्यक्तीमध्ये स्वतः ची ओळख निर्माण करण्याची क्षमता आहे हा संदेश देणे हा होता. आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक जण आपली स्वप्ने दाबून स्वतःला कमी समजू लागतात. त्यामुळे बॉडी शेमिंगविरुद्ध बॉडी पॉझिटिव्हिटी आणि प्रेरणेचा संदेश देण्यासाठी या मंचाची सुरुवात करण्यात आली आहे.

सीझन २ मध्ये देशभरातून मोठ्या संख्येने स्पर्धक सहभागी झाले होते. या कार्यक्रमात दै. मुंबई हलचलचे संपादक दिलशाद एस. खान यांचा विशेष सन्मान करण्यात आला. स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे आहेत :

मिसेस इंडिया मॉडेल किताब अर्पिता ठाकूर कोठारी (आर्किटेक्ट) यांनी जिंकला. प्रथम रनर-अप मोनिका तिवारी (शिक्षिका) आणि द्वितीय रनर-अप दीपाली वसंत (फायनान्शियल ॲडव्हायझर) ठरल्या.

मिस्टर इंडिया मॉडेल किताब पुष्पक पाटील (कॉमेडी कलाकार) यांनी पटकावला. प्रथम रनर-अप अरविंद कुमार सिन्हा (कंट्री क्लब मॅनेजर) आणि द्वितीय रनर-अप पंकज शर्मा (फिटनेस ट्रेनर) राहिले.

तसेच मिस इंडिया मॉडेल किताब सई शेंडगे (हिप-हॉप डान्सर) यांनी जिंकला. प्रथम रनर-अप विभूषा कांदळकर (लावणी नृत्यांगना) ठरल्या.

सबटायटल विजेत्यांमध्ये सरिता गुप्ता यांना फोटोजेनिक फेस, रीना सोबती यांना इंटेलेक्च्युअल आयकॉन, अश्विनी जोशी यांना कॉनजेनियलिटी आयकॉन आणि रेश्मी मुन्सी यांना कॉन्फिडेंटल क्वीन हा किताब देण्यात आला.

विजेत्यांना कर्वी ग्लॅमरकडून आकर्षक क्राउन, सॅश, ट्रॉफी, सर्टिफिकेट आणि खास भेटवस्तू देण्यात आल्या. यामध्ये आर के गोल्डकडून १ ग्रॅम सोन्याची चेन देखील देण्यात आली. गिफ्ट पार्टनर कपिल सिंह आणि क्राउन पार्टनर समीर मेहता होते.



सर्व स्पर्धकांनी तीन दिवसांच्या विशेष प्रशिक्षणामध्ये कठोर परिश्रम केले आणि त्याच मेहनतीमुळे त्यांनी हे यश संपादन केले. कार्यक्रमाच्या आयोजन समितीत मॅनेजिंग डायरेक्टर भारत शेंडगे, इन्क्युरमेंट मॅनेजर रेनाल्डो रोजारियो, सेलिब्रिटी ग्रूमर प्रशांत जाधव, मेकअप पार्टनर लेक्मे मालाड वेस्ट, कॉस्च्युम डिझायनर रिया जरसानिया, सतीश नाशित आणि झिनल खान, तसेच बिग सपोर्टिंग पार्टनर नेविल करवाना (नेकझेड एंटरप्रायझेस) आणि प्रेझेंट्स विशिक (राहुल शर्मा) यांचा समावेश होता.

या भव्य कार्यक्रमाला महाराष्ट्र सरकारचे मंत्री आशीष शेलार, मुख्यमंत्री यांच्या पत्नी आणि गायिका अमृता फडणवीस, माजी मंत्री व आमदार असलम शेख, सुप्रसिद्ध अभिनेत्री ईशा देओल, अभिनेते गोविंदा तसेच या चित्रपटाचे दिग्दर्शक राजीव रुइया यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व सहकारी आणि स्पर्धकांनी दिलेल्या योगदानाबद्दल आयोजकांनी सर्वांचे मनापासून आभार मानले.

## तर काँग्रेस उमेदवार देणार - वड्डेटीवार

**मुंबई -** अजित पवार यांच्या निधनाने रिक्त झालेल्या बारामती विधानसभेसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनाच राष्ट्रवादीकडून उमेदवारी दिली जाणार आहे. त्याविरोधात शरद पवारांची राष्ट्रवादी उमेदवार देणार नाही अशी भूमिका खासदार सुप्रिया सुळे यांनी जाहीर केली होती. त्यानंतर आता महाविकास आघाडीतील काँग्रेसच्या भूमिकेने सर्वात मोठा ट्विस्ट आला आहे. सुप्रिया सुळेंचे वक्तव्य आम्हाला मान्य नाही. 'बारामती पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवार देणार नसेल तर काँग्रेस उमेदवारीबाबत विचार करेल, असं विजय वडेट्टीवार म्हणाले. सुप्रिया सुळे यांनी सुनेत्रा पवार यांच्याविरोधात उमेदवार देणार नसल्याचं बोलल्यानंतर वडेट्टीवार यांनी हे मोठे वक्तव्य केलं आहे. महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी या दोन विधानसभा मतदारसंघात येत्या २३ एप्रिलला मतदान आणि ४ मे रोजी निकाल होणार आहे. शरद पवार गटाची भूमिका आम्हाला मान्य नाही. जर तिकडे राष्ट्रवादी लढणार नसेल तर आम्ही तिकडे निवडणूक लढायचा विचार करू. पवार विरुद्ध पवार निवडणुका यापूर्वी झाल्या आहेत. ही जागा राष्ट्रवादी पक्षाकडे आहे. विलिनीकरण हा विषय होता तेव्हा काँग्रेसशी चर्चा केली नव्हती.

## टी राजसिंह ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज हिंदु राष्ट्र-जागृती सभा



**छत्रपती संभाजीनगर -** शहरातील पिसादेवी परिसरातील पळशी रोड, श्रीराम पेट्रोल पंपच्या पाठीमागे असलेल्या कै. द्रौपदाबाई नानाभाऊ काळे क्रीडा संकुल मैदानात गुरुवार, दि. १९ मार्च सायंकाळी ६ वाजता 'विराट हिंदु-राष्ट्र जागृती सभे'चे आयोजन हिंदु जनजागृती समिती आणि विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या वतीने करण्यात आले आहे.

या हिंदू-राष्ट्र जागृती सभेला भाग्यनगर येथील 'श्रीराम युवा सेने'चे संस्थापक-अध्यक्ष आमदार टी. राजा सिंह तसेच सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरु नंदकुमार जाधव आणि हिंदु जनजागृती समितीची मराठवाडा संघटक कु प्रियंका लोणे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

या हिंदु राष्ट्र जागृती सभेला मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थतीत राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### महावितरणने केलेल्या विविध उपाययोजनांमुळे पुढील पाच वर्षांत विजेचे दर कमी होतील

# २०२९ पर्यंत वीजदरात स्थिरता येणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी -** महाराष्ट्र महावितरण कंपनीने १ लाख कोटी रुपयांचा वर्षाचा महसूलाचा टप्पा पार करून देशातील सर्वात मोठी कंपनी होण्याचा मान मिळवला आहे. सौर ऊर्जेच्या वाढत्या वापरामुळे आता राज्यातील उद्योगांना, सोलर अवर्समध्ये (सकाळी ९ ते ५) वीज वापरल्यास २५ टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे. महावितरणने केलेल्या उपाययोजनांमुळे पुढील पाच वर्षांत विजेचे दर वाढण्याऐवजी दरवर्षी १.२ टक्क्यांनी कमी होतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

आमदार चेतन तुपे यांनी सौर ऊर्जेचा लाभ कमी झाल्यामुळे वीज देयकात वाढ होत असल्याबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाला मुख्यमंत्री उत्तर देत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पूर्वी रात्री १२ ते ६ या वेळेत वीज वापरासाठी सवलत दिली जात असे, कारण तेव्हा वीज शिल्लक असायची. मात्र, आता सौर ऊर्जेमुळे दिवसा (सकाळी ९ ते ५) विजेची उपलब्धता प्रचंड वाढली आहे. त्यामुळे राज्य शासनाने धोरण बदलून दिवसा वीज वापरणाऱ्यांना २५ टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. याचा मोठा फायदा उद्योगांना होणार आहे.महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने (एमइआरसी) वीज खरेदीच्या अंदाजात आणि भांडवली खर्चात काही तांत्रिक चुका केल्या होत्या. यामुळे महावितरणचे सुमारे ८०,००० कोटी रुपयांचे एनर्जी चार्जेस आणि ५५,००० कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधांचा खर्च नाकारला गेला असता. राज्य शासनाने या चुका आयोगाच्या निदर्शनास आणून दिल्या, ज्यामुळे कंपनीचे मोठे नुकसान टळले आणि ग्राहकांवरील संभाव्य दरवाढीचा भार कमी झाला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात औद्योगिक वीज दरात कपात करण्यात आली आहे. सध्या महाराष्ट्रात औद्योगिक विजेचा दर ८.३२ रुपये प्रति युनिट आहे.२०२९-३० पर्यंत हा दर कमी होऊन ७.३८ रुपये इतका होईल. तमिळनाडू (९.३५ रुपये) आणि गुजरात (८.४३ रुपये) या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचा वीज दर स्पर्धात्मक आणि येत्या काळात देशात सर्वात स्वस्त असेल. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने सुरुवातीला कृषी ग्राहकांचे दर ३० टक्क्यांनी वाढवले होते, तर औद्योगिक दर कमी दाखवले होते. सरकारने या विसंगतीवर आक्षेप घेतल्यावर आयोगाने सुमोटो अंतर्गत जुनी ऑर्डर मागे घेऊन ती सुधारली आहे. यामुळे शेतकऱ्यांवरील वाढीव वीज दराचा भार कमी झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कॅप्टिव्ह सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्यांनी जर बॅटरी स्टोरेज सिस्टिमचा वापर केला, तर त्यांना २४ तास सवलतीच्या दरात वीज उपलब्ध होऊ शकते. बॅटरी स्टोरेजचे दर आता २.८० ते २.९० रुपयांपर्यंत खाली आले असून, उद्योगांनी या तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना आणि पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जात आहे. गेल्या तीन वर्षांत औद्योगिक विजेची मागणी २३ टक्क्यांनी वाढली आहे, जे राज्यात उद्योग मोठ्या प्रमाणावर येत असल्याचे निदर्शक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

# अर्णेश कुमार निकालाच्या गैरवापरामुळे कायद्याचा धाक संपला

### पोलीस यंत्रणेतील भ्रष्टाचारावर ॲड. महेश धन्नावत यांचा हल्लाबोल

**जालना । प्रतिनिधी -** सर्वोच्च न्यायालयाच्या अर्णेश कुमार प्रकरणातील मार्गदर्शक तत्त्वांमुळे पोलीस ठाण्यातच जामीन देण्याचे प्रमाण वाढले आहे. परंतु, पोलीस विभागातील वाढत्या भ्रष्टाचारामुळे सामान्य नागरिकांचा छळ होत असून पीडितांना न्याय मिळत नसल्याची भावना बळावत आहे, असे परखड मत प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. महेश एस. धन्नावत यांनी व्यक्त केले आहे. या मार्गदर्शक तत्त्वांचा गैरफायदा घेऊन सराईत गुन्हेगार कायद्याच्या कचाट्यातून सहज सुटत असल्याने समाजात कायद्याचा धाक कमी होत चालल्याची गंभीर चिंता त्यांनी व्यक्त केली.

ॲड. धन्नावत यांनी निदर्शनास आणले की, अनेक प्रकरणांमध्ये सराईत गुन्हेगार पोलीस अधिकाऱ्यांशी संगनमत करून पोलीस ठाण्यातून तात्काळ जामीन मिळवतात. जामिनावर सुटल्यानंतर ते पुन्हा पीडित व्यक्तीलाच धमकावणे आणि त्रास देणे सुरू करतात. यामुळे पीडित व्यक्ती पूर्णपणे हतबल झाली असून, न्यायव्यवस्थेवरील त्याचा विश्वास उडत चालला आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ () च्या कलम ४१ (आता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ () चे कलम ३५) अंतर्गत अनावश्यक अटकेला आळा घालण्याचा उद्देश चांगला असला तरी, त्याच्या अंमलबजावणीतील त्रुटींमुळे पीडितांवर अन्याय होत आहे.

या गंभीर परिस्थितीवर भाष्य करताना ॲड. धन्नावत यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या एका महत्त्वाच्या निरीक्षणाचा दाखला दिला. *डेप्युटी रिजनल डायरेक्टर, एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स कॉर्पोरेशन विरुद्ध मे. आशु इंजिनिअरिंग वर्क्स* (प्रथम अपील क्र. ७५६/२०११) या खटल्यात न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांनी म्हटले आहे की, ''आपल्या देशात कायद्याचे उल्लंघन वाढण्याचे कारण म्हणजे कायद्याचा कमी झालेला धाक किंवा भीती. हे समाजात कायद्याच्या चौकटीत राहण्याच्या तत्त्वांच्या विरोधात आहे.'' उच्च न्यायालयाचे हे निरीक्षण सध्याच्या परिस्थितीला तंतोतंत लागू होत असल्याचे ॲड. धन्नावत म्हणाले.

या समस्येवर एक व्यवहार्य तोडगा सुचवताना ॲड. धन्नावत यांनी कायद्यात महत्त्वपूर्ण दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते, पोलिसांना अटक करण्याचे अधिकार पुन्हा सक्षमपणे द्यावेत, परंतु त्याच वेळी आरोपीला कमीत कमी वेळेत न्यायालयासमोर हजर करण्याची कठोर तरतूद असावी. यासाठी किमान एक न्यायालय २४ तास किंवा दोन शिफ्टमध्ये (उदा. सकाळी ७.०० ते रात्री ११.४५ पर्यंत) कार्यरत ठेवावे. यामुळे आरोपीला न्यायालयाकडून जामीन मिळण्याची खात्री असेल, पीडिताच्या हिताचे रक्षण होईल आणि पोलीस ठाण्यातील भ्रष्टाचाराला आळा बसेल. पोलीस ठाण्यांमध्ये काही ठराविक लोकांचा आणि विशिष्ट वकिलांचा सतत वावर असतो, जे न्यायदान प्रक्रियेत अडथळा आणतात. या सर्व प्रकाराविरोधात लवकरच एक मोठे जनआंदोलन उभारणार असल्याचे ॲड. धन्नावत यांनी जाहीर केले. या कायदेशीर बदलांसाठी ते लवकरच मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री श्री. रावसाहेब दानवे यांची भेट घेणार आहेत. सरकारने या प्रकरणात वेळीच लक्ष घालून कायद्यात सुधारणा न केल्यास त्यांना गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल, कारण यामुळे सरकारची प्रतिमा मलीन होत आहे, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला आहे.

### मनपा सभेत महिला प्रश्नांना प्राधान्य देण्याची मागणी

# महिलांना चर्चेसाठी अधिक वेळ देण्याची भूमिका

### महिलांना चर्चेसाठी अधिक वेळ देण्याची भूमिका

**जालना । प्रतिनिधी -** शहर महानगरपालिकेची नुकतीच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत शहरातील विविध नऊ मूलभूत मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. या पार्श्वभूमीवर माध्यमांशी बोलताना नगरसेविका सौ. संध्या संजय देठे यांनी सभागृहातील महिला प्रतिनिधित्वावर लक्ष वेधले. महानगरपालिकेत महिला सदस्यांची संख्या अधिक असल्याने आगामी सभांमध्ये महिलांना चर्चेसाठी अधिक वेळ देण्यात यावा, अशी मागणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांना पुरेसा वेळ मिळाल्यास त्यांच्या मूलभूत सुविधा, समस्या आणि शहरातील विविध प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडता येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



तसेच, महिलांच्या गरजांनुसार महानगरपालिकेच्या वतीने योग्य धोरण राबवले जाईल आणि महिलांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी सभागृहात ठोस आवाज उठवला जाईल, असेही देठे यांनी स्पष्ट केले.







पाडव्याच्या शुभमुहूर्तावर सोनं खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी; दागिन्यांच्या दुकानांमध्ये उत्साहाचे वातावरण. (छायाचित्र किरण खानापुरे)

# जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांनी केले नववर्षाचे स्वागत



**मंठा । प्रतिनिधी -** गुढीपाडवा हा मराठी नववर्षाचा पहिला दिवस असून विजय, समृद्धी व नवचैतन्याचे प्रतीक मानला जातो. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाटोदा येथील विद्यार्थ्यांनी गुढ्यांची निर्मिती करीत गुढीपाडवा उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी पालकांच्या मार्गदर्शनाखाली पारंपरिक वेशभूषा परिधान करून गुढ्यांची निर्मिती केली. यावेळी शिक्षकांनी गुढीपाडव्याचे शाळेत सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. शाळेतील आनंदी वातावरणातून सणाचा उत्साह पाहायला मिळाला.

## आसई येथील अमरजीत बाहेती यांना संगीत विषयातील पीएच.डी. प्रदान

**जाफराबाद । प्रतिनिधी -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून अमरजीत राम बाहेती यांना ''मराठवाड्यातील स्वातंत्र्योत्तर लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीतातील स्त्रियांचे स्थान व योगदान: चिकित्सक अभ्यास'' या विषयातील संशोधनासाठी संगीत विषयातील पीएच. डी. प्रदान करण्यात आली. त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाच्या संगीत विभाग प्रमुख डॉ. वैशाली संतोष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण केले. या यशाबद्दल अमरजीत यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे. सुनंदा गोरे, सुजाता कानगो, रेखा आवरगांवकर, डॉ. भारती गवळी, डॉ. रजनी शिखरे, डॉ. निलिमा पांडे, डॉ. सुधाकर शेंडगे, डॉ. कैलास अंभुरे, प्रभाकर गाढे, मंगला बारोटे, नामदेव नवले आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. अमरजीत बाहेती या संगीतामध्ये विशारद असून डॉ. वैशाली देशमुख, प्रा. पं. विजय देशमुख, प्रा. आनंद पाटील, पं. राम विधाते व बजरंग विधाते, आशालता भंडारे हे त्यांचे संगीतातील गुरू आहेत.

# हक्काचे घर आणि स्वतःची स्वतंत्र ओळख ही प्रत्येक स्त्रीची प्राथमिकता असावी - प्रज्ञा पोंक्षे

रोटरी व इनरव्हील परिवारातर्फे ९ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान






**जालना । प्रतिनिधी -** महिलांनी केवळ घराच्या चौकटीत न राहता आर्थिक नियोजनात सक्रिय सहभाग नोंदवला पाहिजे. जोपर्यंत महिला स्वतःचे आर्थिक निर्णय स्वतः घेत नाहीत आणि स्वतःच्या पायावर उभ्या राहत नाहीत, तोपर्यंत खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होणार नाही. स्वतःच्या हक्काचे घर आणि स्वतःची स्वतंत्र ओळख ही प्रत्येक स्त्रीची प्राथमिकता असायला हवी, असे प्रेरक विचार मुंबई येथील नामवंत उद्योजिका तथा त्रिमित रचना आणि हरहायनेसच्या संस्थापक संचालिका प्रज्ञा पोंक्षे यांनी येथे बोलताना केले.

रोटरी आणि इनरव्हील फॅमिली ऑफ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. १७ मार्च रोजी शहरातील रुक्मिणी गार्डन येथे महिला आर्थिक सक्षमीकरणावर आयोजित विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर रोटरी क्लबच्या अध्यक्ष वर्षा पित्ती, रोटरी रेनबोच्या अध्यक्ष डॉ. प्रतिभा श्रीपत, रोटरी इलाईटचे अध्यक्ष उमेश बजाज, रोटरी मिडटाऊनचे अध्यक्ष अंकित अग्रवाल, रोटरी सेंट्रलचे अध्यक्ष डॉ. आशुतोष सोनी, इनरव्हील क्लबच्या अध्यक्ष काजल पटेल, रोटरी होरायझनच्या अध्यक्ष हेमा जयस्वाल, इनरव्हील सेंट्रलच्या अध्यक्षा पल्लवी अग्रवाल यांची उपस्थिती होती.

प्रज्ञा पोंक्षे पुढे म्हणाल्या की, आर्थिक स्वातंत्र्य हे महिलांना समाजात सन्मानाची वागणूक मिळवून देते. छोट्या-छोट्या बचतीतून आणि योग्य गुंतवणुकीतून आपण मोठी आर्थिक उद्दिष्टे गाठू शकतो. आर्थिक बचतीची सवय लावून स्वतःचे घर घेण्याचे स्वप्न उराशी बाळगा. घर केवळ वास्तू नसून तो एक सुरक्षिततेचा आणि स्वाभिमानाचा भाग आहे. बदलत्या काळात कष्ट करण्यासोबतच स्मार्ट वर्क करून आर्थिक प्रगती कशी साधता येईल, यावर त्यांनी प्रकाश टाकला. महिलांनी नवनवीन कौशल्ये आत्मसात करून उद्योजकतेकडे वळावे, असा सल्ला त्यांनी दिला. कमावलेल्या पैशांचे योग्य नियोजन आणि गुंतवणूक कशी करावी, याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. बँकिंग व्यवहार आणि सरकारी योजनांची माहिती महिलांनी आवर्जून ठेवावी, असेही त्यांनी नमूद केले.

प्रारंभी या कार्यक्रमात समस्त महाजन ट्रस्टच्या नूतन देसाई, प्रीती लाहोटी, सविता दसपुते, कौशल्यादेवी अग्रवाल, शुभांगी येमूल, सरिता बगडिया, स्वाती भरवाडा, कल्पना शहा आणि विजयालक्ष्मी शर्मा या विविध क्षेत्रातील ९ कर्तृत्ववान महिलांचा त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता गादिया आणि सोनाली मानधना यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. प्रतिभा श्रीपत यांनी मानले. या कार्यक्रमाला शहरातील महिला, प्रतिष्ठित मान्यवरांसह रोटरी आणि इनरव्हील क्लब परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिजाऊ कबड्डी चषक भविष्यात राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडवेल-वंदनाताई मगरे

जालन्यात राज्यस्तरीय जिजाऊ कबड्डी चषकचा शुभारंभ; २२ संघांचा सहभाग



**जालना । प्रतिनिधी -** खेळ हा केवळ जय-पराजयासाठी नसून तो अभिमान आणि प्रेरणेचा सोहळा आहे. जिजाऊ कबड्डी चषकामुळे स्थानिक खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळत आहे. भविष्यात जालन्यात महापौर कबड्डी चषक आयोजित करण्यात येऊन क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन दिले जाईल. जिजाऊंच्या नावाने आयोजित हा चषक भविष्यात राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडवेल, असा विश्वास महापौर वंदनाताई मगरे यांनी येथे बोलताना व्यक्त केला.

महात्मा ज्योतिबा फुले सामाजिक कार्य सेवाभावी संस्था जालना आणि राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून जालन्यात राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर आयोजित तीन दिवसीय पुरुष व महिलांच्या निमंत्रित गटातील राज्यस्तरीय जिजाऊ कबड्डी चषकचे उद्घाटन बुधवार दि. १८ मार्च रोजी वंदनाताई मगरे यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. या स्पर्धेत १२ पुरुष तर १० महिलांचे संघ सहभागी झाले आहेत. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी देशातील प्रथम मंडल स्तंभ निर्माते माजी आमदार डॉ. नारायणराव मुंडे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून भाजपाचे महानगर अध्यक्ष भास्करराव दानवे, मनपाच्या स्थायी समितीचे सभापती अशोक पांगारकर, नगरसेवक सिद्धिविनायक मुळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे संचालक डॉ. सचिन देशमुख, ओमप्रकाश देवडा बँकेचे संचालक नरेंद्र मोदी हे उपस्थित होते तर व्यासपीठावर मुख्य संयोजक महात्मा फुले सामाजिक कार्य सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रा. सत्संग मुंडे, भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सुघोष मुंडे, आश्लेषा स्कूलच्या संचालिका शुभदा मुंडे, क्रीडा मार्गदर्शक अरविंद देशमुख, राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके आदींची उपस्थिती होती.

अध्यक्षीय भाषणात डॉ. नारायणराव मुंडे म्हणाले की, कबड्डी आणि इतर देशी खेळ हे बहादुरीचे खेळ आहेत. सामाजिक न्याय टिकवण्यासाठी आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी आमची संस्था सदैव तत्पर आहे. खेळाडूंनी आपल्या खेळाच्या जोरावर शहराचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन त्यांनी केले. भास्कर दानवे म्हणाले की, जालना शहराचा विस्तार होत असताना खेळाच्या मैदानांची आवश्यकता आहे. खेळाडूंसाठी पायाभूत सुविधा आणि चांगले मैदान उपलब्ध करून देण्यासाठी आमचा प्रयत्न राहील. खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याचे स्वप्न उराशी बाळगावे. अशोक पांगारकर म्हणाले की, आजच्या काळात मैदानी खेळ कमी होत चालले आहेत, ही चिंतेची बाब आहे. अशा वातावरणात खेळाडूंनी मैदानावर उतरणे कौतुकास्पद आहे. प्रास्ताविकपर भाषणात सत्संग मुंडे म्हणाले की, जिजाऊ चषकाचे उद्घाटन महिला महापौराच्या हस्ते होत असून, महाविद्यालयही महिलेच्या नावाने असून प्राचार्य देखील महिलाच आहेत. हा एक योगायोग असून, जिजाऊ चषक स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागातील खेळाडूंना एकत्र आणण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत राज्यभरातील संघ सहभागी झाले आहेत. या स्पर्धेत खेळाडूंनी दाखवलेला उत्साह प्रेरणादायी आहे, असे ते म्हणाले. यावेळी इतर मान्यवरांनी ही मनोगत व्यक्त केले. आज पहिल्या दिवशी महिला आणि पुरुष असे असे दोन संघांचे सामने झाले.

प्रारंभी माँ जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, भगवान बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. उद्घाटन समारंभाला मान्यवर आणि कबड्डीप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सहसंयोजक विजय कामड, आयोजन समितीचे पदाधिकारी सुदामराव सदाशिवे, अरविंद देशमुख, ॲड. शिवराम सतकर, सुभाष कोळकर, देवराव सोनवणे, ओमप्रकाश चितळकर आदी परिश्रम घेत आहेत.

## विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांचे मानसिक सक्षमीकरण काळाची गरज - डॉ. गजानन खरात



**जालना । प्रतिनिधी -** दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये सकारात्मकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांचे शास्त्रोक्त समाधान शोधण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DEIT) जालना समग्र शिक्षा अंतर्गत समावेशित शिक्षण साहित्य विकसन कार्यशाळेत क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट डॉ. गजानन खरात यांनी पालकांना ''दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांचे समुपदेशन'' या विषयावर सर्व स्पेशल एज्युकेटर प्रशिक्षणार्थींना सखोल मार्गदर्शन केले.

स्वीकृती हाच प्रगतीचा पाया

कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. खरात म्हणाले की, पाल्याच्या दिव्यांगत्वाची माहिती मिळाल्यावर पालक सुरुवातीला धक्का, नकार किंवा अपराधीपणाच्या भावनेत असतात. मात्र, ही कोणाचीही चूक नाही हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. पालकांनी या परिस्थितीचा स्वीकार करून पाल्याच्या मर्यादांपेक्षा त्याच्यातील सुप्त गुणांवर (Strengths) लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

महत्त्वाचे मार्गदर्शन आणि उपाययोजना

कार्यशाळेत दिव्यांग मुलांच्या पालकांसाठी खालील महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकण्यात आला:

सकारात्मक प्रोत्साहन (Positive Reinforcement): मुलांच्या चिडखोर वृत्तीवर उपाय म्हणून त्यांना ओरडण्याऐवजी, त्यांच्या चांगल्या वागण्याबद्दल शाबासकी देऊन प्रोत्साहन देण्याचे तंत्र पालकांना आत्मसात करावे

पालकांचे स्वतःचे आरोग्य: ''तुमचे मूल तेव्हाच सुखी असेल जेव्हा तुम्ही सुखी असाल,'' हा मोलाचा संदेश देत डॉ. खरात यांनी पालकांना स्वतःच्या छंदासाठी वेळ काढण्याचा आणि बर्नआउट टाळण्याचा सल्ला दिला.

कौशल्यावर आधारित शिक्षण: केवळ पुस्तकी ज्ञानावर भर न देता मुलांना स्वावलंबी बनवण्यासाठी दैनंदिन जीवन कौशल्ये (Activities of Daily Living - ADL) शिकवण्याचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले.

शासकीय योजनांची माहिती: दिव्यांग प्रमाणपत्र (UDID Card), रेल्वे व बस सवलती, पेन्शन योजना आणि कायदेशीर पालकत्व यांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली, इपिलेप्सी, सेरेब्रल पाल्सी, ऑटिझम आणि ADHD साठी औषधोपचार नियमित केल्याने मुलांमध्ये चांगली सुधारणा दिसून येते हेही त्यांनी आवर्जून सांगितले.

वर्तणूक सुधारणा आणि हट्टीपणावर उपाय केल्यास त्यांच्या वर्तनात चांगल्या प्रकारे सुधारणा दिसून येते. सदरील प्रशिक्षण प्रसंगी प्रशिक्षण समन्वयक प्राध्यापक सय्यद अख्तर सर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालना, रवींद्र कदम सर समग्र शिक्षा अभियान जालना, आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.